## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ | २७४४५.८३ हे आर | • गावांची संख्या | ३६ |
| • ग्रामपंचायती | ३४ | • नगरपरिषद | नाही |
| • पोलीस ठाणी | २ | • महसूल मंडळे | ४ |
| • जि.प.सर्कल | २ | • प्रा.आरोग्य केंद्रे | २ |
| • शाळांची संख्या | २०० | • महाविद्यालये | ५ |

## रघुनाथ स्वामी समाधी

ब्रम्हनाळ ता. पलूस येथे रघुनाथ स्वामी व त्यांचे शिष्य आंनदमूर्ती यांच्या समाधी आहेत. पलूस तालुक्यातील भाविकांच्या या समाध्या श्रद्धास्थाने होत. रामनवमीला येथे मोठा उत्सव/यात्रा असते. मुळात ब्रम्हनाळ हे कृष्णा व येरळा या दोन नद्यांचे संगम स्थळ आहे. पाडव्याच्या दिवशी गावात असलेल्या मठातील देवतांच्या मूर्ती समाधी स्थळी वाजत-गाजत आणल्या जातात. रामनवमी हा उत्सवाचा मुख्य दिवस असतो.

## कुंडलचे जैन मंदिर

कुंडल हे दक्षिण महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांपैकी एक तीर्थक्षेत्र आहे. तीन हजार वर्षापूर्वी जैन धर्मियांचे तेवीसावे तीर्थंकर श्री पार्श्वनाथ भगवंताची आणि सत्तावीसशे वर्षापूर्वी चोविसावे तीर्थंकर वर्धमान महावीर या दोघांचीही धर्म सभा येथे झाली होती. गावाच्या मध्यभागी ग्रामपंचायती जवळ दक्षिणाभिमुख जैन मंदिर आहे. गावाच्या चौथऱ्यावर पार्श्वनाथ यांची ५ फूट ४ इंच उंच अशी पद्मासनातील भव्य मूर्ती आहे.

## वीर भद्रनाथ मंदिर

कुंडल गावाच्या पश्चिमेला २ किमी अंतरावर हे लिंगायत समाजाचे देवस्थान आहे. बहमनी काशीनाथ वैशिष्ट्यपूर्ण गुहा या डोंगरावर आहेत. वीरभद्र हे देवस्थान जमिनीपासून ३०० फूट उंचीवर आहे. दरवर्षी कार्तिक अमावस्येला येथे यात्रा भरते. वीरभद्र विवाह सोहळा विविध कार्यक्रमांसह साजरा होतो. या यात्रेसाठी महाराष्ट्र कर्नाटकातून भाविक मोठ्या प्रमाणावर येतात. या यात्रेचा प्रसाद हा बाजरीची भाकरी व हिरव्या मिरचीचा ठेचा असतो.

Scanned by CamScanner

## भिलवडीचा दगडी घाट

इ.स. १७७९ मध्ये मराठा सुल्तनीचे सरदार श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन यांनी बांधला आहे. हा घाट म्हणजे वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे. हा घाट सव्वा चारशे फूट लांब आहे. याची रुंदी १०२ फूट आहे व दोन्ही बाजूला ४ फूट व्यासाचे चौदा बुरूज आहेत. या घाटाला ४२ पायऱ्या असून गावाकडील बाजूस दगडी ओवरी आहे. ओवरांच्या पाठीमागे घाटाच्या मध्यभागातून समांतर असे भुयार आहे. या भुयाराचा वापर महिला नदीपात्रात जाण्यासाठी करीत असत. महिलांच्या स्नानासाठी नदी पात्राच्या मध्यभागी कुंडे होती. या कुंडाच्या खोलगट भागात घोडे, जनावरे यांचे अपघात होवू लागल्याने कालांतराने येथे अष्टकोटी मंदिर बांधण्यात आले आहे.

## श्री क्षेत्र औदुंबर

सांगली जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांपैकी श्री क्षेत्र औदुंबर हे श्री दत्तात्रयांचे जागृत स्थान आहे. पलूस तालुक्यात भिलवडी गावाजवळ कृष्णा नदीच्या काठी रम्य परीसरामध्ये हे देवालय आहे. औदुंबर हे पश्चिम महाराष्ट्रातील आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाते. श्री गुरूचरित्रामध्ये श्रीक्षेत्र गाणगापूर, नृसिंहवाडी, श्रीक्षेत्र औदुंबर या तीन महत्त्वाच्या दत्तक्षेत्रांचा उल्लेख आढळतो.

श्री दत्तअवतार नृसिंह सरस्वती यांनी काशी येथे सन्यास दिक्षा घेतली. तीर्थस्थानांना भेटी देत संचार करू लागले. कृष्णाकाठचा हा निसर्ग पाहून महाराजांचे पाय इथेच स्थिरावले. त्यांनी शके १३२५ च्या सुमारास औंदुबर वृक्षास्थळी तपश्चर्या सुरू ठेवली. महाराजांनी भक्तांचे साकडे घातल्याप्रमाणे औंदुबर वृक्षाच्याखाली पादुकारुपाने निरंतन वास करेन असे आश्वासन देवून प्रयाण केले. १८७० मध्ये या ठिकाणी मंदिर बांधण्यात आले. मंदिराच्या उत्तरेस श्री शिवशंकरानंद मठ, श्रीनारायणतीर्थ स्वामी मठ आहे.

दत्तमंदिराच्या पूर्वेस पैलतीरावरील आदिमाता श्री भुवनेश्वरी मंदिर आद्य शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते. नृसिंह सरस्वती औदुंबर येथे आहे. त्या आधी भुवनेश्वरी येथे वसली आहे. रम्य परिसर, दगडी रेखीव हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिर परिसरात दगडी बुरूज, समोरील दगडी दीपमाळा, हनुमान, गणपती, काळभैरव, महादेवांची छोटी मंदीरे, प्रवेशद्वारे या मंदिराचा परीसर विलोभनीय आहे.

औंदुबर येथील कृष्णेचा डोह रमणीय आणि लोभस असा आहे. अलीकडे श्री दत्तमंदिर व पैलतीरावर भुवनेश्वरी मध्ये कृष्णेचा डोह आहे. त्यावरून भाविकांना ने आण करणारी नौका चालते. नृसिंह सरस्वतीच्या निर्वाणदिनी फुलांनी सजविलेला पाळणा सोडला जातो. बाजूला सुंदर घाट बांधण्यात आला आहे. मार्गशीर्ष मध्ये

Scanned by CamScanner

दत्तजयंतीस दत्तजन्मोत्सव व महाप्रसाद होतो. श्री. नरसिंह सरस्वती निर्वाण महोत्सव होतो. माघ वद्य ५ या दिवशी गुरूपादुकाची महापूजा होते. त्या दिवशी गावातून पालखी निघते.

## मातीतील कुस्तीची जपणूक

मातीतील कुस्तीची परंपरा जपणारे कुंडलचे कुस्ती मैदान देशात प्रसिद्ध आहे. हे मैदान 'महाराष्ट्र कुस्ती मैदान' या नावाने ओळखले जाते. दरवर्षी आंतरराष्ट्रीय किर्तीचे मल्ल कुस्तीसाठी कुंडल या ठिकाणी उपस्थित राहतात.

## साहित्यपुष्पे

* प्रतिवर्षी संक्रातीदिवशी होणारे औंदुबरचे साहित्य संमेलन
* कवी सुधांशु – कवी औंदुबर
* म. भा. भोसले – जेष्ठ साहित्यिक औंदुबर
* सदानंद सामंत – जेष्ठ साहित्यिक
* ज्येष्ठ साहित्यिक म.भा.भोसले, 'सदानंद सामंत व सुधांशु यांनी साहित्यसंमेलनाची सुरूवात
* अल्पावधितच सदानंद सामंत यांचे निधन
* सामंतांच्या स्मरणार्थ साहित्य मंडळाला 'सदानंद साहित्य मंडळ' असे नाव देण्यात आले.
* पलूस, सावंतपूर, कुंडल, सांडगेवाडी येथेही साहित्यसंमेलन भरविली जातात.
* दिवंगत स्वातंत्र्यसेनानी ना.कृ.किंकर यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी होणारे साहित्यसंमेलन
* सावंतपूर येथील अशोक वाचनालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कथाकथन, काव्यवाचन, हस्तलेखन स्पर्धा
* कोजागिरी पौर्णिमेदिवशी घेतले जाणारे कोजागर साहित्य संमेलन
* २० व्या शतकाच्या प्रारंभी १९२५ पासून साहित्यातून प्रबोधन आणि प्रबोधनापासून साहित्य परिवर्तन करणारी किर्लोस्कर खबर, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर इ. मासिके
* 'कथा', किर्लोस्करवाडी' ची – मुकुंदराव किर्लोस्कर
* साप्ताहिक आपले जग– प्रकाशक – वसंत आपटे व उदय वेलणकर
* साहित्य व प्रबोधन – परंपरा उद्योगमहर्षी लक्ष्मणराय रामआण्णा किर्लोस्कर, शंकरभाऊ किर्लोस्कर, मुकुंदराव किर्लोस्कर
* तालुक्यामध्ये सुभाष कवडे, ज्ञानेश्वर कोळी, प्रा.संतोष काळे, श्रीमती वासंती मेरू, प्रा. डॉ. संपतराव पार्लेकर, लता ऐवळे, सर्जेराव खरात, मारूती शिरतोडे, विजय

Scanned by CamScanner

जाधव, हिम्मत पाटील, नितीन माळी, शहाजी कापसे, रमजान मुल्ला, शाहीर देशमुख, मानगुडे, हरिभाऊ पुदाले इ. साहित्यिकांचा साहित्य जागर सुरूच आहे.

## जमीन

| | |
|---|---|
| • एकूण क्षेत्रफळ | २७४४५.८३ हेक्टर |
| • लागवडीखालील क्षेत्र : | २४६९६ हेक्टर |
| • बागायत क्षेत्र : | १८११३.५५ हेक्टर |
| • कोरडवाहू क्षेत्र : | ६५८० हेक्टर |
| • डोंगराळ क्षेत्र : | नाही |
| • पडीक क्षेत्र : | नाही |
| • वन क्षेत्र : | नाही |
| • क्षारपड क्षेत्र : | ६८२४.४४ हेक्टर |

Scanned by CamScanner